# ४ नेव्हल एनसीसी युनिट, नागपूर येथे सायबर जागरूकता उपक्रम; एनसीसी कॅडेट्सना ऑनलाइन फ फसवणूक, फिशिंग, ओटीपी सुरक्षा आणि सोशल मीडिया वापराबाबत मार्गदर्शन

Posted on September 18, 2026 by Prakaash Khilare



क्विक हील फाउंडेशनच्या 'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा' उपक्रमांतर्गत ४ नेव्हल एनसीसी युनिट, नागपूर येथे एनसीसी कॅडेट्सना सायबर सुरक्षेबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

## *GIFS नागपूरच्या विद्यार्थ्यांनी एनसीसी कॅडेट्सना सुरक्षित डिजिटल व्यवहार, मजबूत पासवर्ड आणि वैयक्तिक माहितीच्या संरक्षणाबाबत व्यावहारिक मार्गदर्शन केले.*

*क्विक हील फाउंडेशनच्या **'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा'** या जनजागृती उपक्रमांतर्गत ४ नेव्हल एनसीसी युनिट, नागपूर येथे सायबर जागरूकता उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाद्वारे एनसीसी कॅडेट्समध्ये वाढत्या सायबर धोक्यांविषयी जागरूकता निर्माण करून सुरक्षित आणि जबाबदार डिजिटल व्यवहारांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.*

*शिक्षक समन्वयक **डॉ. आशिष भादिये सर** यांच्या मार्गदर्शनाखाली **गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स, नागपूर (GIFS)** येथील विद्यार्थ्यांनी हा उपक्रम राबविला. या सत्रात **सायबर वॉरियर्स रविराज बोलके आणि आनंद पाटील** यांनी एनसीसी कॅडेट्सशी संवाद साधत विविध प्रकारच्या सायबर धोक्यांची माहिती दिली.*

*सत्रादरम्यान **ऑनलाइन फसवणूक, फिशिंग, हॅकिंग, सोशल मीडिया सुरक्षा, ओटीपीची सुरक्षितता, मजबूत पासवर्डचा वापर आणि वैयक्तिक माहितीचे संरक्षण** या विषयांवर विशेष मार्गदर्शन करण्यात आले. सायबर गुन्हेगारांकडून नागरिकांना लक्ष्य करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या विविध पद्धती समजावून सांगताना कॅडेट्सनी कोणत्याही संशयास्पद लिंकवर क्लिक करण्यापूर्वी किंवा अनोळखी व्यक्तीस माहिती देण्यापूर्वी योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक असल्याचे जाणून घेतले.*

*सायबर सुरक्षेच्या संकल्पना अधिक प्रभावीपणे समजावून सांगण्यासाठी सत्रात **वास्तविक जीवनातील उदाहरणांचा** आधार घेण्यात आला. फिशिंग संदेश, संशयास्पद कॉल किंवा लिंक, ओटीपी मागणारे संदेश तसेच सोशल मीडिया खात्यांच्या सुरक्षेशी संबंधित संभाव्य धोके याबाबत कॅडेट्सशी चर्चा करण्यात आली. वैयक्तिक माहिती, पासवर्ड आणि डिजिटल खात्यांची माहिती इतरांसोबत शेअर न करण्याचे महत्त्वही यावेळी स्पष्ट करण्यात आले.*

*कॅडेट्सनी या संवादात्मक सत्रात सक्रिय सहभाग घेत विविध प्रश्न उपस्थित केले. त्यांच्या प्रश्नांना उदाहरणांसह उत्तरे देत सुरक्षित डिजिटल व्यवहारांशी आवश्यक असलेल्या दैनंदिन सवयींबाबत व्यावहारिक मार्गदर्शन करण्यात आले. डिजिटल माध्यमांचा वाढता वापर लक्षात घेता तरुणांनी तंत्रज्ञानाचा वापर करताना सजग राहणे आणि सायबर धोक्यांची प्राथमिक माहिती असणे आवश्यक असल्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.*

***'सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा'** या उपक्रमाचा मुख्य उद्देश तरुणांमध्ये सायबर सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण करणे, संभाव्य ऑनलाइन फसवणुकीपासून स्वत:चे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ज्ञान देणे आणि सुरक्षित डिजिटल व्यवहारांना प्रोत्साहन देणे हा आहे. ४ नेव्हल एनसीसी युनिट, नागपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे कॅडेट्सना सायबर धोके ओळखण्यास तसेच त्यापासून बचाव करण्यासाठी आवश्यक असलेल्या सुरक्षित डिजिटल पद्धती समजून घेण्यास मदत झाली.*


Prakaash Khilare

*प्रकाश खिलारे हे स्थानिक समाचार डिजिटल मीडिया चे सहसंपादक असून सामाजिक, राजकीय, शैक्षणिक आणि स्थानिक घडामोडींवरील बातम्यांचे वृत्तांकन करतात. जनसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणे, स्थानिक पातळीवरील महत्त्वाच्या घटनांची अचूक माहिती वाचकांपर्यंत पोहोचवणे आणि निष्पक्ष पत्रकारितेच्या माध्यमातून समाजाशी जोडलेले राहणे हा त्यांचा लेखनाचा मुख्य उद्देश आहे. डिजिटल पत्रकारितेच्या माध्यमातून ते विविध विषयांवर सखोल आणि प्रभावी बातम्या प्रकाशित करतात. आपण आपल्या परिसरातील बातम्या, माहिती तसेच लेख देण्याकरिता संपर्क करू शकता....*

*मो. 9112225235*

*Email- prakaashkhilare@gmail.com*


**Posted in** Quick Heal Foundation, नागपूर जिल्हा, विदर्भ, शिक्षण, सायबर सुरक्षा जनजागृती

**Tagged** ४ नेव्हल एनसीसी युनिट नागपूर, Prakaash Khilare, आनंद पाटील, एनसीसी कॅडेट्स, ऑनलाइन फसवणूक, ओटीपी सुरक्षा, क्विक हील फाउंडेशन, गव्हर्नमेंट इन्स्टिट्यूट ऑफ फॉरेन्सिक सायन्स नागपूर, डिजिटल सुरक्षा, डॉ. आशिष भादिये, नागपूर, नागपूर जिल्हा, नागपूर तालुका, नागपूर शहर, नेव्हल एनसीसी, फिशिंग, मजबूत पासवर्ड, रविराज बोलके, वैयक्तिक माहिती संरक्षण, सायबर जनजागृती, सायबर जागरूकता, सायबर वॉरियर्स, सायबर सुरक्षा, सायबर सुरक्षेसाठी सायबर शिक्षा, सोशल मीडिया सुरक्षा, स्थानिक समाचार, हॅकिंग